पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय

**सभावृत्तांत**
(इ क्षेत्रीय समितीची मासिक सभा)

दिनांक : ०७/०६/२०१९ वेळ: सकाळी ११.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची माहे जून २०१९ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०७/०६/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य/ नगरसदस्या उपस्थित होते.

१) मा.बुर्डे सुवर्णा विकास **- अध्यक्षा**
२) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
३) मा.डोळस विकास हरिचंद्र
४) मा.उंडे लक्ष्मण धोंडू
५) मा. घुले नानी उर्फ हिराबाई गोवर्धन
६) मा.गायकवाड निर्मला मनोज
७) मा.श्री.सागर बाळासाहेब गवळी
८) मा.गोफणे अनुराधा देविदास
९) मा.बारसे प्रियांका प्रविण
१०) मा.संतोष (अण्णा) ज्ञानेश्वर लोंढे
११) मा.भिमाबाई पोपट फुगे

**स्विकृत सदस्य**

१२) बुर्डे अजित प्रताप
१३) मा.साधना सचिन तापकीर
१४) मा.लांडे विजय नामदेव

या शिवाय मा.श्री.श्रीनिवास रामचंद्र दांगट - क्षेत्रीय अधिकारी, मा.श्री.प्रविण घोडे – कार्यकारी, श्रीम.प्रेरणा शिनकर – उपअभियंता स्थापत्य, श्री.राजेंद्र शिंदे – उपअभियंता स्थापत्य, श्री.वहीकर एस.एस.-उपअभियंता, श्री.लांडे बी.पी. उपअभियंता, श्री.बोरावके डी.एच.-उपअभियंता (स्थापत्य), श्री.राजेश नंदलाल भाट – सहा.आरोग्याधिकारी, श्री.ए.व्ही. गुमास्ते – मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.मेंगशेट्टी ए.एम. कनिष्ठ अभियंता, श्री.कुलकर्णी आर.पी.-कनिष्ठ अभियंता, श्री.फाटक डी.डी. -कनिष्ठ अभियंता, श्री.ताकवले क.अभियंता (स्थापत्य.), श्री.सुनिल बेळगावकर – कनिष्ठ अभियंता पा.पु., श्री.कुतवळ एस.यु. – कनिष्ठ अभियंता ज.नि., श्रीम.वृषाली पोतदार क.अभियंता (स्थापत्य), श्री.तानाजी गायकवाड – हॉर्टी सुपरवायझर, श्री.गायकवाड एस.पी.- उद्यान सहाय्यक, सौ.भोज जे.एस.- क्रिडा पर्यवेक्षक, श्री.सुरेश कोदंटे – कार्यालय अधिक्षक अतिक्रमण, श्री. सतिश लांडगे-

अतिक्रमण निरीक्षक, पवळे जयश्री - समुह संघटक ना.वि.यो, श्री.विनय जगताप-स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक इत्यादी अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

(मा. इ प्रभाग समितचे सभापती पदावर मा.बुर्डे सुवर्णा विकास यांची निवड झाल्याबद्दल क्षेत्रीय अधिकारी मा.श्रीनिवास दांगट यांचे वतीने पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. तसेच उपस्थित सर्व सन्मा. सदस्य व अधिकारी यांचेवतीनेही मा.बुर्डे सुवर्णा विकास यांचे स्वागत करण्यात आले व त्यांना कामकाजाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. मा.डोळस विकास हरिश्चंद्र व मा.श्री.सागर बाळासाहेब गवळी यांची क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सदस्य पदावर निवड झाल्याबद्दल तसेच मा.श्रीम.गोफणे अनुराधा देविदास व मा.श्रीम.फुगे भिमाबाई पोपट यांची महिला व बालकल्याण समिती सदस्य पदावर निवड झाल्याबद्दल मा.सभापती बुर्डे सुवर्णा विकास यांचे वतीने पुष्पगुच्छ देवून अभिनंदन करण्यात आले व भविष्यातील कामकाजाबाबत शुभेच्छा देण्यात आल्या.)

मा.सभापती यांनी उपस्थित सन्मा.नगरसदस्य/ नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करून सभा सूरू करणेस अनुमती दिली.

मा.सभापती यांचे परवानगीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात समाविष्ट करण्यात आले.

विषय क्रमांक १ मौजे मोशी येथील बी.आर.टी. रस्ता ते शिवाजी वाडी (सर्व्हे क्र. १६ ते २१, ७५, ७६, ८०) रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१३ कलम २०५ अन्वये घोषित करणे.

विषय क्रमांक २ मौजे भोसरी येथील सर्व्हे नं. ६८१/३ सीटीएस नं. ३४०० मधील रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१३ कलम २०५ अन्वये घोषित करणे.

अ) दिनांक ०१/०३/२०१९ रोजी घेणेत आलेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १२) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक ०९/०५/२०१९ रोजी घेणेत आलेल्या विशेष सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०१) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ०२ | विषय क्रमांक | : | ०१ |
| दिनांक | : | ०७/०६/२०१९ | विभाग | : | नगर रचना/ शहर सुधारणा |
| सुचक | : | मा.प्रियंका बारशे | अनुमोदक | : | मा.संतोष लोंढे |

संदर्भ मा. लक्ष्मण सोपान सस्ते यांचा प्रस्ताव
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

मौजे मोशी येथील बी.आर.टी. रस्ता ते शिवाजी वाडी (सर्व्हे क्र. १६ ते २१, ७५, ७६, ८०) रस्ता या भागात फार मोठया प्रमाणात रहिवाशी राहात असून वसाहतीमधील नागरीकांस वाहतुकीकरिता ९ मीटर रस्त्याची आवश्यकता आहे. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१३ कलम २०५ अन्वये मौजे मोशी येथील बी.आर.टी. रस्ता ते शिवाजी वाडी (सर्व्हे क्र. १६ ते २१, ७५, ७६, ८०) रस्ता ९ मीटर घोषित करणेस मान्यता देणेकामी सदरचा विषय मा.शहर सुधारणा समितीमध्ये पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ०३ | विषय क्रमांक | : | ०२ |
| दिनांक | : | ०७/०६/२०१९ | विभाग | : | नगर रचना/ शहर सुधारणा |
| सुचक | : | मा.भिमाबाई फुगे | अनुमोदक | : | मा.संतोष लोंढे |

संदर्भ मा. नितीन ज्ञानेश्वर लांडगे यांचे दिनांक ०७/०६/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

मौजे भोसरी येथील सर्व्हे नं. ६८१/३ सीटीएस नं. ३४०० मधून असणाऱ्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका मंजूर विकास आराखड्यानुसार स्पॉट झोनिंग (औद्योगिक/ रहिवाशी) आहे. सदर स्पॉट झोनिंग मधील औद्योगिक व रहिवाशी नागरीकांसाठी दळणवळण तसेच औद्योगिक मालाची ने आण करणेकामी सदर रस्त्याची तात्काळ आवश्यकता आहे. सदर रस्ता नकाशात अधोरेखित असून सदर रस्ता २०५ अन्वये विकसित झाल्यास महानगरपालिका व नागरिक आणि औद्योगिकरणाची अडचण दूर होणार आहे. सदर रस्ता उत्तरेपासून दक्षिणेकाडे अर्धवट स्थितीत असल्याने २०५ अन्वये विकसित करणे क्रमपात्र होईल. त्यामुळे सदर रस्ता महानगरपालिका अधिनियम २०५ अन्वये घोषित करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

**सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे चर्चा करणेत आली.**

**मा.प्रियांका बारसे** : आळंदी रोड ते दिघी रोड या नाल्याचे तळास काँक्रटीकरण करणेत यावे. आळंदी रोड ते दिघी रोड या नाल्याचे सफाईची कामे तातडीने पूर्ण करून घ्यावीत, नाल्यामध्ये बरीचशी झाडे वाढलेली आहेत. ड्रेनेज लाईनचे चेंबर फुटलेले असलेने घान पाणी नाल्यात येत असून त्यामुळे नागरीकांना डासाचा त्रास होत आहे. चेंबरचे झाकण दुरूस्ती केल्यास ड्रेनेजचे पाणी नाल्यात येणार नाही व नागरीकांना त्रास होणार नाही. स्थापत्य विभागामार्फत डांबरीकरणाचे काम अद्याप सूरू झालेले नाहीत. पाईपलाईनची कामे करण्यात आली त्यावेळी जूने पाईप रस्त्याचे कडेने व गल्लीमध्येच पडलेली आहेत. ती उचलण्यात यावीत. प्रभागामध्ये एलइडी लाईट नाहीत. त्याबाबत मुख्यालयात मागणी करावी.

**क्षेत्रीय अधिकारी :** सन २०१५ चे पर्यावरण विभागाचे अहवालानुसार नाल्याचे बेस मध्ये कॉंक्रीटीकरण केल्यास जमीनीत पाणी मूरत नाही व परिणामी जमीनीतील पाण्याची पातळी खोलवर होत आहे. त्यामुळे मनपाने नाल्याच्या तळास कॉंक्रटीकरण करणे बंद केले आहे. डांबरीकरणाचे काम सोमवार पासून सूरू करणेत येणार आहे. जूने लाईट दूरूस्त करण्यात येतील.

**मा.भिमाताई फुगे :** फिडर पिलर नादूरूस्त झालेली आहेत त्यांचे झाकन तुटलेले आहेत. त्यांस चिटकून जनावरे मरण्याच्या ब-याच घटना घडलेल्या आहेत. जिवीत हाणी होऊ नये यासाठी सदर कामासाठी आवश्यक तरतुद वर्ग करणेत यावी. विद्यूत तारांवर आलेल्या झाडांच्या फांद्या छाटणीसाठी उद्यान विभागास कळविण्यात यावे. संबंधित अधिकाऱ्यांनी स्टॉर्म वॉटर लाईनची पाहणी करावी व पाऊस सूरू होण्याआधी झाकणे दूरूस्त करून घ्यावी. ड्रेनेजचे चोकअप निघत नाही म्हणून काही ठिकाणी ड्रेनेज लाईन स्टॉर्म वॉटर लाईनला जोडल्या आहेत. समर्थ नगर ते खंडोबा माळ पर्यंत ड्रेनेज लाईन चोकअप आहे.

**कार्यकारी अभियंता विद्यूत:** १५ जून २०१९ रोजी होणाऱ्या अंदाजपत्रक विषयक महासभेमध्ये फिटर पिलर, जंक्शन बॉक्स/ डीपी यांचे दुरूस्तीसाठी उपसूचना सन्माननियांनी मंजूर करून घ्यावी.
**मा.सागर गवळी:** अमृत योजनेतील रस्त्यांचे डांबरीकरण बाकी आहे. पावसाळा सूरू होत आहे. स्टॉर्म वॉटर लाईनचे झाकण तातडीने दूरूस्त करून घ्यावेत.

**मा.संतोष अण्णा लोंढे:** भोसरी मधील नाल्याची भिंत जागोजागी पडलेली आहे ती दुरूस्त करण्यात यावी. जागोजागी कचरा पडलेला आहे. ड्रेनेज लाईनची संबंधितांनी पाहणी करून आवश्यक ठिकाणी दूरूस्ती करून घ्यावी. आरोग्य व स्थापत्य विभागने समन्वय साधून सदरचे काम करावे. फवारणी करणेबाबत संबंधितांना सूचना देणेत याव्यात. चोरीने नळ कनेक्शन घेतले जातात याबाबत तक्रार दिलेली आहे. तक्रारी बाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्यात यावी. रस्त्याचे कडेने असलेल्या विद्यूत मिनी बॉक्सची झाकणे तुटलेली आहेत. एमएसइबी ला पाठविणेत आलेल्या पत्राची प्रत द्यावी.
**मा.घुले नानी:** सावंत नगर ते कष्णा मिठाई पर्यंत अंडर ग्राउंड केबलचे काम बरेच दिवसापासून प्रलंबित आहे. भारतमाता नगर येथील झाडाच्या फांद्यांची छाटणी करणेत यावी.

**कार्यकारी अभियंता विद्यूत:** विद्यूत विषयक कामासाठी २० लाख रूपयाची तरतूद आलेली आहे. सध्या कामाचे अंदाजपत्रक तयार करणे चालू असून त्यानंतर टेंडर प्रक्रिया करून पुढील कार्यवाही करणेत येईल.
**मा.लक्ष्मण उंडे :** स्ट्रीट लाईटचे झाकण तुटलेली आहेत ती दूरूस्त करून घ्यावी.
**अध्यक्षा :** पालखी मार्गावर पाणी, शौचालये यांची व्यवस्था करणेत यावी. प्रभाग समितीच्या पुढील बैठकीस हजर राहणेबाबत महावितरण कंपनीचे अधिकाऱ्यांना पत्र देण्यात यावे. पालखी मार्गावर पाणी, रस्ते सफाई, औषध फवारणी या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांनी नियोजन करावे तसेच पालखी गेल्यानंतर सर्व रस्ते व परिसर स्वच्छ करण्याचे नियोजन करावे.

**मा.निर्मला गायकवाड:**. प्रभाग क्रमांक ४ मध्ये पाणीपूरवठा सूरळीत होत नाही. नागरीकांना पिण्याचे पाणी व्यवस्थित मिळावे यासाठी नियोजन करावे. पाण्याची टाकी ओव्हर फ्लो होत असतांना पाणी भरपूर मिळत नाही. दत्त नगर साई पार्क, कृष्णानगर भागात कचरा गाडी येत नाही.

**क्षेत्रीय अधिकारी :** मा.आयुक्त च-होली येथे पाहणी दौरा करणार आहेत.  विभागातील सर्व अधिकाऱ्यांनी आवश्यक तयारी करून ध्यावी. पालखी मार्गावार संबंधित विभागाने आवश्यक सुविधा पुरविण्याची कार्यवाही पूर्ण करून घ्यावी.  आरोग्य विभागाने प्रभाग क्षेत्रातील नाले सफाईची कामे पूर्ण करून घ्यावी. दिघीमध्ये चेंबर पॅक केलेले आहेत, तेथे पाणी तुंबणार आहे, स्थापत्य विभागाने पाहणी करून आवश्यक दूरूस्ती करून घ्यावी.  सदरचे बैठकीत सन्माननियांनी दिलेल्या सूचनांचे सर्व संबंधितांनी पालन करावे.

यानंतर उपस्थितांचे आभार व्यक्त करून मा.अध्यक्षा यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(सुवर्णा बुर्डे)
अध्यक्षा, इ प्रभाग समिती

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी-३९
जा.क्र.इक्षेका/ १/कावि/२२९ /२०१९
दिनांक :  २५ /०६/२०१९

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

२/- सभावृत्तांतील ठरावानुसार आपले विभागाशी संबंधित विषयाबाबत  योग्य ती नियमाधिन कार्यवाही करणेत यावी. याबाबत वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.